# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.

९३, मल्हारपेठ, सातारा.
दुरध्वनी क्रमांक ०२१६२ - २३४१३० (Extn-२२५)
Email - sp.satara@mahapolice.gov.in


क्र.लेखा/प्रलि/लेखापाल/सनदी लेखापाल नियुक्ती/२०२६ सातारा, दि. /०५/२०२६.

**विषय :-** पोलीस अधिकारी / अंमलदार यांचे फॉर्म नंबर १६ आयकर विवरणत्र, कर सल्ला यासाठी सनदी लेखापाल (C.A.) यांची नेमणूक करणेबाबत.

*****

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, सातारा जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदार व मंत्रालयीन कर्मचारी यांचे सन २०२६-२०२७ या वित्तीय वर्षासाठी फॉर्म नंबर १६ तयार करणे, आयकर विवरणपत्र तयार करणे, तसेच आयकरबाबत करसल्ला देणे याकरीता स्थानिक सनदी लेखापाल (C.A.) यांची नेमणूक करेणसाठी दरपत्रके मागविणेत येत असून खालील नमुद अटी व शर्तीची पूतर्ता करणारे इच्छुक सनदी लेखापाल (C.A.) यांनी दि.०९/०६/२०२६ रोजी १८.१५ वाजेपर्यंत आपली दरपत्रके पोलीस अधीक्षक कार्यालय,सातारा येथील नोंदणी शाखेत बंद लिफाफ्यात (लिफाफ्यावर सनदी लेखापाल नियुक्ती दरपत्रक असे नमुद करावे) सादर करावीत.

**अटी व शर्ती -**

१) या जिल्हयाचे आस्थापनेवरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आयकर विषयक माहिती देणे-घेणेसाठी स्मार्ट मोबाईलवर ॲप बनवुन ते वापरणे संदर्भात सर्व लेखनिक कारकून व मंत्रालयीन कर्मचारी यांना माहिती देणे.

२) सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा सोशल मिडीयावरील ग्रुप तयार करण्यात यावा. सदर ग्रुपवर सर्वांच्या अडी-अडचणींचे निराकरण करण्यात यावे.

३) पोलीस अधीक्षक कार्यालयास सेवा पुरविणारे पुरवठादार यांचे आर्थिक वर्ष २०२६-२०२७ चे TDS रिटर्न २४Q, २६Q आयकर विभागास विहित वेळेत भरणा करुन पोहोच पावती देणे.

४) आयकर कार्यालयाकडुन जर दंडनीय शुल्क भरण्यास काही पत्रव्यवहार झाला असेल तर त्यासंबंधी सर्व पत्रव्यवहार करणे.

५) सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आयकर संबंधात कोणतीही शंका असल्यास त्या शंकेचे निरसन करणे व आवश्यकतेनुसार पत्रव्यवहार व कार्यवाहीची माहिती देणे तसेच आयकर संबंधित माहिती देण्यासाठी जास्तीत जास्त शिबीर आयोजित करावेत.

६) सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार आयकर वजावतीची माहिती विहित मुदतीत कार्यालयास पुरविणे.

७) सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या आयकराची परिगणना करुन, फॉर्म नं.१६ तयार करुन विहित मुदतीत सॉफ्ट कॉपी कार्यालयास पुरविणे.

८) सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे आर्थिक वर्ष २०२६-२०२७ चे वैयक्तीक आयकर रिटर्न आयकर विभागास विहित मुदतीत सादर करणे.

९) आयकर विषयक कामकाजाकरीता आपलेकडील १ ते २ कर्मचारी आठवडयातील ०३ दिवसासाठी समक्ष उपस्थित राहतील.

१०) आयकर विषयक सर्व कामकाजाची १००% पूर्तता करण्याची जबाबदारी आपल्यावर राहील.

११) आवश्यकतेनुसार आयकर विषयक माहिती पोलीस अधिकारी, अंमलदार व कर्मचारी यांना त्यांचे मागणीनुसार माहिती पुरविण्यात यावी.

(निखील पिंगळे)
**पोलीस अधीक्षक, सातारा.**

**प्रति,**

पोलीस निरीक्षक,
सायबर पोलीस ठाणे.